E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# मराठी कवितेतील आई प्रतिमा: एक चिकित्सा ( विशेष संदर्भ : कवी यशवंत, माधव ज्युलियन आणि ग्रेस)

**प्रा. दीपक भगवानराव राखुंडे**
**मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, जि. जालना.**

मुकुंदराज, चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांनी पद्य वाङ्मयातून ग्रंथ निर्मिती केली. अगदी प्राचीन काळापासून पद्याच्या माध्यमातून कविता हा वाङमय प्रकार संतांनी सामान्य लोकांपर्यंत पोहचवराण मध्ययुगीन काळात संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास या संतांनीही पद्य प्रकारातून गाथा, भावार्थरामायण, मनाचे श्लोक यासारखे ग्रंथ साकार केले. आधुनिक कालखंडात केशवसुत, गोविंदाग्रज, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, गिरीश , कवी यशवंत, ग्रेस, माधव ज्युलियन, बालकवी, इंदिरा संत, शांता शेळके यांच्या लेखणीतून कवितेचे दालन अधिक समृद्ध होत गेले. मराठी कवितेच्या कक्षा रुंदावल्या.

1945 नंतर नवकवितेला प्रारंभ झाला. दुसऱ्या महायुद्धाचे सावट सामाजिक, राजकीय क्षेत्रांवर पडले गेले. या महायुद्धाचे पडसाद साहित्यावरही उमटत गेले.बा.सी. मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून या महायुद्धाचे चित्रण चपखलपणे अधोरेखित केले. त्यांची 'प्रेमाची लव्हाळे' ही कविता त्याचा प्रत्ययकारी नमुना आहे. या कवितेतून त्यांनी वर्णन केले आहे की,

**'आसपास मूडद्यांची रास**
**विमानांचे हल्ले बेचिराख जिल्हे'**

दुसऱ्या महायुद्धात झालेली मनुष्यहानी त्यांनी आपल्या कवितेतून मांडली आहे. त्यांनी ही संवेदनशीलता अधिकाधिक गोचर केली. याच काळातील राजकीय विषयावर भाष्य करताना ते आपल्या कवितेतून व्यक्त होतात की,

**' जो जो उठे, तो तो नेता**
**मारी लंब्या चवड्या बाता**
**परी हुल्लडीचा नियंता कोणी नाही'**

बा. सी. मर्ढेकरांनी तत्कालीन परिस्थितीची जाण आणि भान आपल्या कवितेत व्यक्त केले आहे.

मराठी कवितेतून निसर्ग,शेतशिवार ,मानवी भावभावना, ग्रामीण संस्कृतीचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले दिसते. त्यातल्या त्यात ग्रामीण कवितेतून मानवी स्वभाव, आई,बाप ,शेतीमाती, नातीगोती या प्रतिमांचा अलगदपणे वापर करण्यात आला. विशेषतः काही कवींनी 'आई ' ही प्रतिमा आपल्या कवितेतून ताकदीने मांडली आहे.

विविध नातेसंबंधांच्या कवितेतून अंतरिक जाणीवा अधिक प्रभावीपणे स्पष्ट होत गेल्या. 'आई ' हा आपल्या जिव्हाळ्याचा विषय असतो. घराला घरपण देणारी असते ती फक्त आई! म्हणून आई संदर्भातील महत्त्वाच्या कविता काही कवींनी हाताळल्या आहेत. त्यामध्ये विशेषतः कवी यशवंत, माधव ज्युलियन, ग्रेस आणि फ. मुं. शिंदे यांच्या 'आई' या प्रतिमेच्या कविता वाचकांच्या कायम स्मरणात राहणाऱ्या आहेत.

गणगोतातील आतील एक हक्काचं नातं आपलेपण जपणारं नातं म्हणजे आई आपल्या मुलांसाठी ते असतं एक ऊर्जा केंद्र संस्काराचं जिव्हाळ्याचं छत्र म्हणजे आई कवी यशवंत यांनी आपल्या कवितेतून आई ही प्रतिमा पूर्ण साकारली आहे. आई सोडून गेल्यानंतरची शोकभावना त्यांनी अनेक प्रतिमांचा अतिशय संवेदनशीलपणे वापर करून आपल्या कवितेत त्या भावना व्यक्त केल्या आहेत.

**'आई म्हणोनी कोणी**
**आईस हाक मारी**
**ती हाक येई कानी**
**मज होय शोककारी**
**नोहेच हाक माते**
**मारी कुणी कुठारी'**

आईचा वियोग व त्यातून विमनस्क अवस्था त्यांनी आपल्या कवितेतून अगदी भावनिक वीण साधत टिपली आहे. हा विरह हृदय पिळवटून टाकणारा वाटतो. आई नसताना 'आई ' हा शब्द कानावर पडला की, प्रचंड दुःख,शोक होतो. त्याची परिसीमा उपरोक्त काव्यपक्तीतून अभिव्यक्त होताना दिसते आहे .तिची आठवण आली की वेदनेचा आगडोंब उसळतो.याचे प्रत्ययकारी वर्णन कवी यशवंत यांनी केले आहे.

**'ही न्यूनता सुखाची**
**चित्ता सदा विदारी**

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

**स्वामी तिन्ही जगाचा**

**आई विना भिकारी'**

आई शिवाय जीवनात सौख्य नाही ही सौख्याची कमतरता कवितेतून स्पष्टपणे त्यांनी मांडली आहे. स्वामीचे स्वामित्व आईविना तोकडे असते. ती कफल्लक अवस्था अगदी भिकाऱ्यासारखी असते असा खोल आशय यातून व्यक्त होतो. त्यापुढे जाऊन ते म्हणतात की,

**'चारा मुखी पिलांच्या, चिमणी हळूच देई**

**गोठ्यात वासरांना, या चाटतात गाई**

**वात्सल्य हे पशूंचे, मी रोज रोज पाही**

**पाहून अंतरात्मा, व्याकुळ मात्र होई**

**वात्सल्य माउलीचे आम्हा जगात नाही'**

आईच्या वात्सल्याची तीव्र जाणीव व्यक्त करण्यासाठी चिमणी, गाय, पिले, वासरू या प्रतिमांचा त्यांनी वापर केला आहे. त्यातून मनाची व्याकुळता कशी शिगेला पोहोचली याचा या कवितेतून प्रत्यय येतो.

आईचे वात्सल्य या जगात नसल्याने अंतरिक वेदना खरोखरच अस्वस्थ करणारी असते. कवितेत खऱ्या अर्थाने प्रतिमेला अनन्यसाधारण महत्त्व असते. प्रतिमा सृष्टी कवितेचा गाभा असतो .ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मते, उपमा, रूपक, अलंकाराधी घटक म्हणून ओळखला जाणारा जो काव्यघटक आहे त्यालाच प्रतिमा या संज्ञेने संबोधणारा समीक्षकांचा एक वर्ग आहे.

कवी माधव ज्यूलियन यांनी आपल्या प्रेमस्वरूप आहे या कवितेतून आई आणि मुलाच्या वात्सल्यांची कारुण्य भाव स्वीकारलेले आहे ते कवितेतून म्हणतात की,

**'प्रेमस्वरुप आई, वात्सल्यसिंधु आई**

**बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी'**

साक्षात वात्सल्याचा सागर असलेली आई मात्र जवळ नसल्याने मनाच्या भावनांचे वाळवंट रूक्ष वाटते ही अंतरिक वेदना कवीने मांडली आहे. सात्विक प्रेमाचे प्रतीक म्हणजे आई आहे. ही जिव्हाळ्याची ऊर्मी त्यांनी आपल्या कवितेतून उत्कटपणे व्यक्त केली आहे.

**'ही भूक पोरक्याची होईन शांत आई**

**पाहून या दुजांचे वात्सल्य लोचनाही**

**वाटे येथून जावे तुझ्या पुढे निजावे**

**नेत्री तुझ्या हसावे चित्ती तुझ्या ठसावे'**

आई या प्रेमळ नात्याचा वियोग खरोखरच मनाचा खोल तळ ढवळणारा वाटतो. शेवटी आई चित्तामध्ये सामावून अस्वस्थ मनाला दिलासा मिळाल्याचा एक भास प्रकट होतो. शेवटी हीच आई जन्मोजन्मी लाभावी आणि तिचा मुलगा म्हणून माझी ओळख असावी अशी सोज्वळ, भोळी भाबडी भावना ही उच्चकोटीची वाटते. असे मागणे साक्षात देवाला मागितले आहे. यातून आई विषयक प्रेमळ भाव ना विरहाची वेदना स्पष्टपणे अधोरेखित होते,

**'घे जन्म तू फिरूनी येईल मी पोटी**
**खोटी ठरवून देवा ही एक 'आस' मोठी'**

असा भावनिक शेवट कवी माधव ज्यूलियन यांनी आपल्या कवितेचा केला आहे.

कवी ग्रेस (माणिक सिताराम गोडघाटे) यांची आई ही कविता ही शोकात्मक भाव प्रकट करणारी कविता आहे पोरक्या मुलाच्या अस्वस्थ मनाचे रूदन नेमक्या शब्दात या कवितेतून व्यक्त होते,

**'ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता**
**मेघात अडकली किरणे हा सूर्य सोडवित होता'**

मुळात या कवितेचा प्रारंभ ग्रेस यांनी 'ती' या सर्व नामाने केला आहे. प्रथमदर्शनी 'ती' या सर्वनामातून त्यांनी कविता का सुरू केली असावी? हा प्रश्न वाचकांना पडतो. तर याचे उत्तर 'आई' हा शब्द उच्चारल्यानंतर वेदनेचा वणवा अधिक तीव्र होण्याची भीती आई गेल्यानंतर प्रत्येक मुलाला वाटते, अगदी त्याच पातळीवर कवी ग्रेस यांनी वेदनेची तीव्रता कमी करण्यासाठी 'ती' हे सर्वनाम वापरून कवितेची सुरुवात केली असावी असा कयास बांधता येतो.

मेघ सूर्य किरणे या प्रतिमांचा वापर करून दुःखांचे मळभ दूर करण्याचा प्रयत्न आईचे स्मरण करून मुलगा करतो आहे असे त्यांनी व्यक्त केले आहे 'पाऊस' ही प्रतिमा विरह-वियोगातील अश्रू या अर्थाने त्यांनी वापरली आहे.

**'ती आई होती म्हणूनी**
**घनव्याकुळ मीही रडलो**
**त्यावेळी वारा सावध**
**पाचोळा उडवीत होता'**

या विरहभावना मुलाला एकाकी करणाऱ्या, काळजात असंख्य आंदोलने निर्माण करणाऱ्या वाटतात. ढगांनी व्याकूळ होऊन बरसावे तशी अवस्था मनाची होते, पण शेवटी भावनांचे विरेचन

म्हणजे अश्रू, रडणे मुलाच्या रडण्याचा संदर्भ घनव्याकूळ अशा शब्दात व्यक्त केला आहे. एकूण ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमांचा ठाव घेणे म्हणजे समुद्रातून मोती शिताफीने काढून घेण्यासारखे आहे.

एकूणच 'आई' ही प्रतिमा कवी यशवंत, माधव ज्युलियन आणि ग्रेस यांनी आशयसंपन्न केली आहे. आई बियोगाचा शोकात्म भावही अत्यंत उच्चतम पातळीवर प्रतिमा प्रतिकांचा योग्य वापर करून त्यांनी अभिव्यक्त केला आहे.

**संदर्भ:**

१) डॉ. काळे अक्षयकुमार, ' ग्रेसविषयी', विजय प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. रसाळ सुधीर, कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, मुंबई

३) डॉ. देशपांडे अ. ना., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हिनस प्रकाशन, पुणे.

४) नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, पुणे.